# दोन शब्द

विख्यात इंग्रजी कादंबरीकार थॉमस हार्डी यांची "दि मेयर ऑफ कॅस्टरब्रिज" या नावाची अतिसुंदर कादंबरी आहे. प्रकाशक श्री. रा. ज. देशमुख यांनी "आवडत्या गोष्टी" लिहिण्यासाठी ज्या काही कादंबऱ्या निवडल्या होत्या, त्यांत ती एक होती. या कादंबरीतील ही गोष्ट मी काही ठिकाणी मुलांना सांगितली होती. ती त्यांना मी जशी सांगत असे, तशीच ती मी लिहून काढली. आवडत्या गोष्टीतील एक भाग म्हणून आज ती प्रसिद्ध होत आहे.

१९४८ — पां. स. साने